महाराष्ट्र शासन
दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/426/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 22/11/2024

## 1)जबरी चोरीचा प्रयत्न :-

**इतवारा :-** दिनांक 21.11..2024 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घराचे छतावर पोस्ट ऑफिस इतवारा नांदेड येथे,** यातील आरोपी नामे राहुल रवि जोंधळे, रा. शांतीनगर इतवारा नांदेड यांनी फिर्यादीचे गळयातील मंगळसुत्र जबरीने हिसकावुन घेण्याचा प्रयत्न केला. फिर्यादी देत नसल्याचे पाहुन आरोपीचे बाजुस पडलेल्या लाकडाने फिर्यादीचे डोक्यात मारून जखमी केले. वगैरे **फिर्यादी लुबानाअंजुम भ्र. अब्दुल हबीब, वय 35 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. पोस्ट ऑफिस इतवारा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 426/2024 कलम 304, 62, 118(1) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2117 कोमुलवार, मो.नं. 8378967999** हे करीत आहेत.

## 2)अवैध रेती चोरी :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक 21.11.2024 रोजी 20.05 वा. चे सुमारास, **माधव बाबाराव मुसळे, शंकरनगरी क्रं. 1 असर्जन नांदेड यांचे घराचे बाजुस मोकळया जागेत नांदेड ता. जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.शेख नाजमोदीन शेख निजामोदीन 2. शेख मेहराज शेख निजामोदीन दोघे रा. विष्णुपूरी नांदेड 3. दत्ता कांबळे, यांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या तीन ब्रास रेती किंमती 12,000/-रू ची टाटा कंपणीचा टिपर क्रमांक एमएच-14/सीपी-5546 किंमती 5,00,000/-रू चा असा एकुण 5,12,000/-रू चा माल रेतीची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2606, माधव परसराम डफडे, पोकॉ ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 1082/2024 कलम 303(2), 221, 327, 3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री चव्हाण, मो.क्रं. 9881429928** हे करीत आहेत.

## 3)शासकीय कामात अडथळा :-

**लिंबगाव :-** दिनांक 20.11.2024 रोजी 17.55 ते 18.10 वा. चे सुमारास, **मौ. राहाटी येथील जि. प. शाळा बुथ क्र-3 वर ता. जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे नागसेन लांडगे, रा. रहाटी ता. जि. नांदेड यास फिर्यादी व साक्षीदार यांना मतदान केंद्रावरील अंमलदार यांना केंद्रप्रमुख यांनी वेळ संपत आहे मतदारांची लाईन लावा त्यांना मतदानाचे टोकण देणे आहे असे कळविल्याने फिर्यादी व साक्षीदार हे मतदारांची लाईन लावत असतांना आरोपीने तुम्ही मला रांगेत थांबा असे का म्हणता म्हणुन रांगेत न थांबता फिर्यादीने दिलेल्या आदेशाचा अवमान करून त्यांच्या सोबत हुज्जत घालुन मोठमोठयाने ओरडुन पोलीस खाते व पीआय हरामखोर आहेत अशी शिवीगाळ करून तुमची बघुन घेतो असे बोट दाखवुन मोठमोठयाने ओरडुन धमकावुन शासकीय कर्तव्य पार पाडण्यास अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी सपोनि श्री मुंजाजी नामदेव दळवे, ने. पोस्टे लिंबगांव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगांव** गुरनं 166/2024 कलम 132, 323,352,351(2),351(3),भारतीय न्याय संहीता-2023 सह कलम 131, 132, लो. प्र. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सय्यद, मो.क्रं. 9767727127** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :-

**रामतिर्थ :-** दि 21.11.2024 ते पाच वर्षा पुर्वी, **फिर्यादीचे सासरी लोहगांव ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. नरेंद्र मोतीराम साखरे, नवरा, 2. मोतीराम संभाजी साखरे सासरा, 3.शांताबाई मोतीराम साखरे सासु 4. मनोजकुमार मोतीराम साखरे बाहया 5. मंगलाबाई राजेश्वर बिजुरकर ननंद रा. बिदर 6.रमाबाई बळीराम वाघमारे, ननंद रा. नरसी 7. हौसाबाई गंगाराम बिजुरकर आत्या रा. लोहगांव या आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे लग्न झाले पासुन आमचे घरात समाधान नाही सुख शांती नाही तु अपयशी आहेस तु माहेरहुन पाच लाख रूपये आण म्हणुन दोन दिवस उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व घरातुन हाकलुन दिले. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 295/2024 कलम 85, 115(2)(3),3(5) भा.न्या.संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास सपोउपनि/अहेमद शेख, मो.क्रं. 9823206916** हे करीत आहेत.

# 5)अपघात :–

**सिंदखेड :–** दिनांक 20.11.2024 रोजी दुपारी 13.30 वा. चे सुमारास, **माहुर ते सारखणी जाणारे महामार्गावरील वाघाई टेकडी जवळ अनिल रूणवाल यांचे शेताजवळ माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे फुलसिंग गुलाब चव्हाण, वय 42 वर्षे, रा. असोली ता. माहुर जि. नांदेड** यास यातील किनवट आगाराची बस क्रं एमएच–06/एस–8532 चे चालक आरापी यांनी त्याचे ताब्यातील एसटी हयगय व निष्काळजीपणे, भरधाव वेगात चालवुन रोडच्या बाजुला उभी असलेली स्कॉर्पीओ जिप क्रं एमएच–26/सीके–2111 या वाहनास घासुन वेगात बस पुढे नेऊन मयत चालवत असलेल्या मोटार क्रं एमएच–26/बीटी–8007 या मोटार सायकलला पाठीमागुन धडक देवुन घासीत पुढे नेल्याने गंभीर जखमी करून मयताचे मरणास कारणीभुत झाला व हिरो होंडा मोटार सायकलचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी नितीन फुलसिंग चव्हाण, वय 19 वर्षे,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं. 137/2024 कलम 106(1)(2), 281, 324(4)(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2471 जी आर कुमरे, मो.नं. 7744002471** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड